N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** कराड शहर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0438 **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/05/2023 20:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 19/05/2023
      **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/05/2023
      **Time From (वेळेपासून):** 13:20 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 13:45 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 19/05/2023 **Time (वेळ):** 20:45 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 054
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/05/2023 20:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड,कराड

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then**
   (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विनायक संभाजी जाधव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 344/345 गुरूवार पेठ कराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 344/345 गुरूवार पेठ कराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिनकर रामचंद्र ठोंबरे | | | 1. गोवारे रोड ,स्वामी समर्थ अपार्टमेंट,सैदापुर ,कराड शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | रामचंद्र श्रीरंग पाटील | | | 1. सिध्दीविनायक कॉलनी , ओगलेवाडी,कराड शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबर दिनांक 19/05/2023
मी, विनायक संभाजी जाधव,वय 37 वर्षे, रा. 344/345 गुरूवार पेठ कराड जि.सातारा मो.नं.8530413255. असा असुन मी दि.15/05/2023 रोजीॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सातारा येथीलपोलीस उप अधीक्षक श्रीमती वैद्य मॅडम यांची समक्ष भेट घेतली व माझेकडे झालेल्या लाचेच्या मागणी बाबतची तक्रार थोडक्यात सांगितली व माझा लेखी तक्रारी अर्ज मी पोउपअधी वैद्य मॅडम यांचेकडे सादर केला. त्यानुसार पोउपअधी वैद्य मॅडम यांनी त्यांचेकडील नेमणुकीचे पोलीस निरीक्षक श्री.पवार यांची समक्ष भेट घालून दिली व माझी तक्रार थोडक्यात पो.नि. पवार यांना सांगून त्यावर पुढील कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेशीत केले. त्यावेळी पोउपअधी वैद्य मॅडम यांना विनंती केली की, संबंधीत लोकसेवकांची मी उद्या भेट घेणार असून मला उद्या पुन्हा ॲन्टी करप्शन कार्यालयात यायला जमणार नसल्याने ॲन्टी करप्शनच्या अधिकाऱ्यांनीच कराड येथे येवून संबंधीत लोकसेवकावर कायदेशीर कारवाई करावी.
त्यानुसार दिनांक 16/05/2023 रोजी सकाळी 10.45 वाजता फोन करुन मला जलशुध्दीकरण केंद्र कराड येथे दुपारी 12.30 वा.चे दरम्यान हजर राहण्यास सांगितले. त्यानुसार मी तेथे हजर राहिलो तेव्हा 12.40 वा.चे सुमारास पो.नि.पवार हे त्यांचे पथकासह 12.40 वा.चे सुमारास खाजगी वाहनाने तेथे हजर झाले. त्यानंतर 13.00 वा.चे सुमारास दोन सरकारी पंच आम्ही होतो त्याठिकाणी हजर झाले. त्यावेळी पो.नि.पवार यांनी पंचांची ओळख करुन घेतली आणि माझी व पंचांची एकमेकांशी ओळख करुन दिली.
त्यानंतर पो.नि.पवार यांनी पंचांना माझी तक्रार थोडक्यात सांगितली की, मी शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष कराड म्हणून काम करीत असून मौजे येरवळे ता. कराड येथील शेतक-यांच्या जमीनी हया टेंभु उपसा सिंचन प्रकल्प योजनेत संपादीत होणार आहेत त्याकरीता शासनाकडून भूमीसंपादनाचे काम सुरू आहे. मौजे येरवळे गांवचे नऊ शेतक-यांनी सदर भुसंपादनाचे कामासाठी सरकारी कार्यालयात पाठपूरावा करणेकामी मला प्रतिज्ञापत्र व संमतीपत्राव्दारेअधिकार दिलेले आहेत. त्याप्रमाणे त्या नऊ शेतकरी यांचे गट क्रं.1717 व 1689 मधील भुमी संपादनाच्या कार्यवाहीबाबत उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड येथे गेलो असता तेथील जमीनीचे मुल्यांकन करणारे क्लार्क ठोंबरे व क्लार्क पाटील यांनी मला सदर कामासाठी आम्हाला पैसे दयावे लागतील, त्याशिवाय काम होणार नाही असे सांगितले. ठोंबरे व पाटील यांचेकडे माझे काम जानेवारी 2022 पासून प्रलंबित होते व ते अद्यापपावेतो पुर्ण करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे माझी खात्री पटली की ठोंबरे व पाटील यांना पैसे दिल्याशिवाय ते माझे काम करणार नाहीत. सदर कामासाठी आवश्यक असलेली शासकीय फी व कागदपत्रे यांची मी पुर्तता केलेली आहे. परंतू ठोंबरे व पाटील हे माझेकडे त्याव्यतिरिक्त लाचेची मागणी करत असल्याने व मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने श्री.टोंबरे व श्री.पाटील यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. माझी लेखी तक्रार पंचांनी वाचून बधितली व त्यावर सहया केल्या.
त्यानंतर पो.नि.पवार यांनी मला व पंचाना पडताळणी पंचनाम्याची कारवाई थोडक्यात समजावून सांगून पडताळणीचे अनुषंगाने मला व पंचांना आवश्यक त्या सुचना दिल्या. पो.नि.पवार यांनी त्यांचे जवळील सील बंद मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये घालून ते माझ्या शर्टच्या आतील बाजूस बनियनला पिनच्या सहाय्याने अडकवले आणि मला व पंच नं. 1 यांना माझ्या खाजगी चारचाकी वाहनाने ठोंबरे व पाटील यांची भेट घेवून लाचेच्या मागणी संदर्भाने पडताळणी करण्यासाठी रवाना केले. ती वेळ 14.00 वा.ची होती. त्यावेळेस पो.नि.पवार व पथकातील इतर लोक तेथे थांबून राहिले.
मी व पंच नं. 1 असे उपविभागीय अधिकारी, कराड कार्यालयात ठोंबरे व पाटील यांची भेट घेण्यासाठी गेलो असता पाटील यांनी माझे जमीनीच्या मुल्यांकनाचे काम करुन देण्यासाठी स्वत: साठी व ठोंबरे यांचेसाठी प्रत्येकी 10,000 /- रुपये अशी एकूण 20,000/- रुपयेची मागणी केली. त्यावेळी ठोंबरे हे कामात व्यस्त असल्याने त्यांच्याशी लाचेच्या मागणी संदर्भाने बोलणे झाले नाही. तेव्हा मी व पंच नं.1 असे माझ्या खाजगी वाहनाने पो.नि.पवार व पथक

थांबले होते त्याठिकाणी परत आलो. तेव्हा पो.नि.पवार यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला आणि मला व पंचांना तेथे काय घडले याबाबत हकीकत विचारली त्यावेळी मी त्यांना वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पो.नि.पवार यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले माझे व पाटील आणि ठोंबरे यांचेमधील संभाषण ऐकले तेव्हा पो.नि.पवार व पंचांची खात्री झाली की, पाटील यांनी माझेकडे 10,000/- रुपये मागितले /आहेत. परंतू ठोंबरे यांचेशी लाचेच्या संदर्भाने बोलणे न झाल्याने, पो.नि.पवार व पंचांनी दि.17/05/2023 रोजी पुन्हा ठोंबरे यांची भेट घेवून लाचेच्या मागणी संदर्भाने पडताळणी करण्याचा निर्णय घेतला व वेळेच्या आणि जागेच्या अभावी दि.16/05/2023 रोजीचा पडताळणी पंचनामा अ‍ॅन्टी करप्शन ऑफिस सातारा येथे जावून पुर्ण करण्याचा निर्णय घेतला आणि मला व पंचांना दि.17/05/2023 रोजी 12.00 वा.चे सुमारास जलशुध्दीकरण केंद्र, कराड येथे थांबून राहण्याच्या सुचना दिल्या.
त्यानुसार मी दि.17/05/2023 रोजी 12.15 वा.चे सुमारास जलशुध्दीकरण केंद्र, कराड येथे हजर राहिलो त्यावेळी पो.नि.पवार व पंच सदर ठिकाणी हजर होते. त्यानंतर पो.नि.पवार यांनी पडताळणीचे अनुषंगाने मला व पंचांना आवश्यक त्या सुचना दिल्या. पो.नि.पवार यांनी त्यांचे जवळील व्हाईस रेकॉर्डर माझ्या शर्टच्या आतील बाजूस बनियनला पिनच्या सहाय्याने अडकविला आणि मला व पंच नं. 1 यांना माझ्या खाजगी चारचाकी वाहनाने ठोंबरे व पाटील यांची भेट घेवून लाचेच्या मागणी संदर्भाने पडताळणी करण्यासाठी रवाना केले. ती वेळ 15.45 वा. ची होती. त्यावेळेस पो.नि.पवार व पथकातील इतर लोक तेथे थांबून राहिले.मी व पंच उपविभागीय कार्यालय कराड येथे गेलो असता ठोंबरे व पाटील यांची भेट झाली त्यावेळी ठोंबरे यांनी 'तुम्हाला काय दयायचे ते दया' असे म्हणून माझ्याकडे लाचेची मागणी केली व पाटील यांनी ठोंबरेसाठी 10,000/- रुपये व स्वत:साठी 10,000/- रुपये असे पाकीटात घालून आणून देण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे माझ्या खाजगी वाहनाने पो.नि.पवार व पथक थांबले होते त्याठिकाणी परत आलो. तेव्हा पो.नि.पवार यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला आणि मला व पंचांना तेथे काय घडले याबाबत हकीकत विचारली. त्यावेळी मी त्यांना वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पो.नि.पवार यांनी पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले माझे व पाटील आणि ठोंबरे यांचेमधील संभाषण ऐकले तेव्हा पो.नि.पवार व पंचांची खात्री झाली की, पाटील व ठोंबरे यांनी माझेकडे प्रत्येकी 10,000/- रुपये असे एकूण 20,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे.
पो.नि.पवार व पंचांनी, वेळेच्या आणि जागेच्या अभावी दि.17/05/2023 रोजीचा पडताळणी पंचनामा अ‍ॅन्टी करप्शन ऑफिस सातारा येथे जावून पुर्ण करण्याचा निर्णय घेतला आणि मला व पंचांना दि.18/05/2023 रोजी 12.00 वा.चे सुमारास जलशुध्दीकरण केंद्र, कराड येथे थांबून राहण्याच्या सुचना दिल्या. परंतू दिनांक 18/05/2023 रोजी पाटील हे कार्यालयात येणार नसल्याचे मला कळाल्याने मी सदरची बाब पो.नि.पवार यांना फोन करुन कळविली. त्यामुळे पो.नि.पवार यांनी मला दिनांक 19/05/2023 रोजी 12.30 वा.चे सुमारास जलशुध्दीकरण केंद्र, कराड येथे थांबून राहण्याच्या सुचना दिल्या.
त्यानुसार मी दिनांक 19/05/2023 रोजी 12.30 वा.सुमारास जलशुध्दीकरण केंद्र, कराड येथे हजर राहिलो त्यावेळी पो.नि.पवार व पंच सदर ठिकाणी हजर होते. त्यानतर पो.नि.पवार यांनी मला व पंचाना सापळा कारवाईची माहिती थोडक्यात समजावून सांगितली. त्यानंतर मी पो.नि.पवार यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 20,000/- रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचासमक्ष हजर केली त्यानुसार पो.नि.पवार यांचे सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले. पो.नि.पवार यांनी अंथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावून सांगून सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती सांगितली. त्यानुसार पो.नि.पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली व अंथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कमेचे प्रत्येकी 10,000/- रुपये असे दोन बंडल करुन माझ्या नेसलेल्या शर्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवली आणि ठोंबरे व पाटील यांना लाचेची रक्कम दिल्या नंतर डाव्या हातदोन वेळा डोक्यावरुन फिरवून इशारा करण्याच्या सुचना पो.नि.पवार यांनी मला दिल्या.त्यानंतर पो.नि.पवार यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन शर्टच्या आतील बाजूस बनियनला पिनच्या सहाय्याने अडकवले आणि मला व पंच नं. 1 यांना माझ्या खाजगी चारचाकी वाहनाने ठोंबरे व पाटील यांची भेट घेवून लाचेची रक्कम देणेकरीतासापळा कारवाई करण्यासाठी रवाना केले.त्यानंतर मी व पंच नं.1 असे उपविभागीय अधिकारी कार्यालय कराड येथे रवाना झालो. ती वेळ 13.20 वा.ची होती.
उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड येथे जावून मी ठोंबरे व पाटील यांची भेट घेतली व मी त्यांना घ्या ओ बापू असे म्हणून लाचेची रक्कम ठोंबरे यांचे समोर धरताच ठोंबरे यांनी त्यांचे टेबलांचे उजवा ड्रॉव्हर उघडून त्यात ठेवा असे सांगितले. त्यानुसार मी 10,000/- रुपये इतकी लाचेची रक्कम ड्रॉव्हर मध्ये ठेवली तेव्हा ठोंबरे यांनी ती ड्रॉव्हर मधील रक्कम उजव्या हाताने उचलून त्यांचे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवली त्यानंतर मी तिथे जवळच बसलेल्या पाटील यांचेकडे गेलो तेव्हा त्यांनी माझ्या खांदयावर हात टाकला व मला घेवून बाहेर पोर्चमध्ये आले

त्यावेळेला मी 10,000/- रुपये इतकी लाचेची रक्कम त्यांचे समोर धरली असता पाटील यांनी ती लाचेची रक्कम त्यांच्या डाव्या हाताने स्विकारुन ती त्यांच्या पॅन्टच्या पुढील बाजूच्या डाव्या खिशात ठेवली. त्यावेळेस लागलीच मी पुर्वनियोजीत इशारा करुन लाचेची रक्कम स्विकारल्याचा पंचांना व पथकाला कळविले. तेव्हा लागलीच पो.नि. पवार व पथकाने तेथे येवून ठोंबरे व पाटील यांना लाचेच्या रक्कमेसहीत ताब्यात घेतले व सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई केली.
अशारितीने 1) दिनकर रामचंद्र ठोंबरे, वरीष्ठ सहाय्यक, भू संपादन(कंत्राटी), उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड व 2) रामचंद्र श्रीरंग पाटील लिपीक, रेल्वे भू संपादन(कंत्राटी), उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड यांनी मला प्राधिकारपत्र दिलेल्या 9 शेतकऱ्यांच्या टेंभू उपसा जलसिंचन प्रकल्पामध्ये गेलेल्या जमीनीचे मुल्यांकन करुन देण्यासाठी दि.16/05/2023 रोजी व दिनांक 17/05/2023 रोजी प्रत्येकी 10,000/- रुपये अशी एकूण 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्या लाचेच्या रक्कमेचा दिनांक 19/05/2023 रोजी स्विकार केला आहे. म्हणून माझी 1) दिनकर रामचंद्र ठोंबरे, वरीष्ठ सहाय्यक, भू संपादन(कंत्राटी), उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड व 2) रामचंद्र श्रीरंग पाटील लिपीक, रेल्वे भू संपादन(कंत्राटी), उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.
माझा वरील टंकलिखीत केलेला खबरी जबाब मी वाचून पाहिला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.
समक्ष हा खबरी जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Bhagwan RAMCHNDRA PATIL(I (Inspector)) / PSMH26077 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): श्री. विक्रम पवार पो.नि. ला.प्र.वि. सातारा

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Bhagwan RAMCHNI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PSMH26077

पोलीस स्टेशन ऑफिसर
कराड शहर पोलीस ठाणे
जि. सातारा.
दि. 14/05/2023